# मुंबई विद्यापीठ

प्रसिद्धि पत्रक
दिनांक-9 सप्टेंबर 2015

मुंबई विद्यापीठ आणि युनिसेफ संयुक्त विद्यमाने 'विकास संवाद' या विषयावर दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन

मुंबई विद्यापीठाचे संज्ञापन आणि पत्रकारिता विभाग आणि युनिसेफ , महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने, १० व ११ सप्टेंबर २०१५ या दिवसंमध्ये 'विकास संवाद' या विषयावर, राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा आयोजित करत आहेत. विकास संवाद ही कार्यशाळा म्हणजे "बालकांच्या अधिकारांच्या दृष्टीकोनातून विकास आणि बालकांचे अधिकार विषयाच्या संदर्भात होणाऱ्या पत्रकारितेतील विकास या कंगोऱ्यांना अग्रभागी ठेवून संवाद असेल"
विकास संवाद या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेत , "प्रतिमा जोशी, संतोष शिंदे, प्रीती पाटकर, डॉ. सिमरन इराणी, बी. एन. कुमार, स्वाती मोहपात्रा हे आणि असे अनेक मान्यवर आपली बाल हक्काबाद्दलची मते आणि बाल हक्काच्या दृष्टीकोनातून केल्या जाणाऱ्या पत्रकारितेच्या बद्दलची मते मांडतील, आणि हा या कार्यशाळेचा महत्वाचा भाग असेल. कार्यशाळेत या सोबतच , "बाल हक्काच्ची गरज, बालकांना त्यांच्या हक्काच्या बाबतीत न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना सर्वोतोपरी मदत करणे , बाल हक्काबद्दल बालकांच्या पालकांना सजग करणे , नवजात मृत्यू चे वाढते प्रमाण." या अश्या अनेक विषयांवर 'विकास संवाद' या कार्यशाळेत मत-मतांतरे होतील.
सामाजिक विकासाच्या संवादात आपणा सर्वांनी हिरीरीने सहभाग घ्यावा ही आग्रहाची विनंती...
स्थान,
व्हर्च्युअल क्लासरूम, फिरोजशहा मेहता भवन ,
मुंबई विद्यापीठ कालिना संकुल,
विद्यानगरी, कालिना, सांताक्रूझ(पूर्व),
मुंबई ४०००९८.
तारीख,
१० व ११ सप्टेंबर, २०१५
वेळ,
सकाळी १० ते संध्याकाळी ०६अधिक माहिती साठी संपर्क ,
डॉ. सुंदर राजदीप (विभाग प्रमुख): ९९६९१४५३५०
श्रीमती. अनुष्का कुलकर्णी : ९८२०७५०१७५